नौपाडा वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ 906 /२०२६ दि. १६/०५/२०२६

"वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात नौपाडा वाहतूक उप विभागाचे हद्दीत रविवार दि.१७/०५/२०२६ आणि दि. २४/०५/२०२६ रोजी **"आनंद पथ "** अर्थात **"हॅप्पी स्ट्रीट"** हा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	१) टिएमसी सर्कल कडून डॉ अरूणकुमार वैदय मार्गाने परमार्थनिकेतन कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **टिएमसी सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने ही सरळ नितीन जंक्शन किंवा अल्मेडा सिग्नल मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	२) परतार्थ निकेतन कडून डॉ अरूणकुमार वैदय मार्गाने टिएमसी सर्कल कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **परमार्थ निकेतन चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने सतरंज वेफर्स शॉप समोरून डावे किंवा उजवे वळण घेवून आराधना चौक किंवा नाशिक मुंबई सर्व्हिस रोड मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील.
पार्किंग मनाई	टिएमसी सर्कल ते परतार्थ निकेतन चौक सर्व प्रकारच्या वाहनांना रस्त्याचे दोन्ही बाजुस पार्किंग करण्यास मनाई राहिल.

सदरची वाहतूक अधिसूचना रविवार दि.१७/०५/२०२६ आणि दि. २४/०५/२०२६ रोजी सकाळी ०६:०० ते ०९.३० वाजेपर्यंत अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालीका, ठाणे.

Scanned with CamScanner

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक

प्रत :— समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,
स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग/पोनि नौपाडा वाहतूक उपविभाग.
२/— म.न.पा. ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.

Scanned with CamScanner